# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 24 / 05 / 2023 (बुधवार) सायंकाळ

---

### विनयभंग

**१) पो.स्टे. मौदा** :— दिनांक ३०/१२/२०२२ चे १५/०० वा. ते दिनांक ०९/०५/२०२३ चे १४/३० वा. दरम्यान फिर्यादी/पिडीता हिने श्रीराम फायनांस कार्पोरेशन प्रायवेट लिमीटेडकडुन दिड लाख रुपये कर्ज घेतले होते. त्याचे दोन आठवडे शिल्लक राहीले होते त्या हप्त्याची वसुली करीता **आरोपी क्र. १) सुभाश सुरुसे, रा. रामटेक** हा फिर्यादीचे घरी आला होता तेव्हा फिर्यादीने मी हे पैसे आता सध्या भरु शकत नाही असे म्हटले असता यातील आरोपीने फिर्यादीला व फिर्यादीच्या पतीला अश्लील शिवीगाळ करुन पैसे भरण्याची धमकी दिली तेव्हा फिर्यादीने म्हटले की बॅंक मॅनेजरला बोलवा तेव्हाच आम्ही पैसे भरू असे म्हटले तेव्हा आरोपी क्र. १ निघुन गेला नंतर फिर्यादीचा लोन केस मध्ये असलेला साक्षीदार हा फिर्यादीचे घरी येऊन सांगु लागला की मला फोनवर आरोपी क्र. १ हा अश्लील शिवीगाळ करीत आहे व त्याची गाडी नेण्याची धमकी देत आहे नंतर आरोपी क्र. २) नामे— विवेक दुबे हा फिर्यादीचे घरी आला व सांगु लागला की आरोपी क्र. १ आमच्याकडे काम करीत नाही आरोपी क्र १ यांनी एपीके फाईल द्वारे मोबाईलचे पुर्ण कॉटेक्ट नंबर हॅक केले व ७ ते ८ कॉटेक्टचे व्हॉट्सअॅपवर फिर्यादीची बदनामी होईल असे मॅसेज केले व फिर्यादीने आरोपी क्र. २ याला फोन करुन मॅसेज बाबत विचारणा केली असता त्यांनी सुद्धा फिर्यादीला धमकावुन म्हटले की तुम्हाला एकाच वेळेस दिडलाख रूपये व्याजा सहीत भरावे लागेल अशी धमकी दिली व आरोपी क्र. ३) नामे— अनुप भांगे याने सुद्धा अशा प्रकारची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३५४, २९४, ५०१, ५०७ भादवि. कलम ६६ माहीती तंत्रज्ञान अधि. २००० कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ ४५ देशमुख मो. नं. ९९२२४४७०४५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. मौदा** :— दिनांक ०२/०४/२०२३ चे ००/०१ वा. ते दिनांक २२/०५/२०२३ चे १६/०० वा. दरम्यान फिर्यादी मुलगी व आरोपी हे फेसबुक फ्रेंड होते. यातील आरोपीने फिर्यादीचे मोबाईल वर असलेली फोटो अश्लील ऑडिट केली आहे ती फोटो सोशल मिडीयावर वायरल करिल अशी धमकी देऊ लागला तसेच नमुद आरोपी याने फिर्यादीचे होणारे पती यांना फेसबुक वर वेगवेगळया आयडी ने मेसेज करून फिर्यादीचे फोटो वायरल करीन अशी धमकी देऊ लागला तसेच आरोपी याने फिर्यादीचे पतीचे नातेवाईक यांना सुध्दा कॉल करून फिर्यादीचे अश्लील फोटो वायरल करीन अशी धमकी देऊ लागला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (क) (ड) ५०६ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोना सतिश नागपूरे ब. नं. ९५३ मो. क्र. ९७६४४१९४१९ हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील काळे लेआउट पंचवटी काटोल येथे दिनांक ०५/०४/२०२३ चे १७.०० वा. ते १८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– गं. भा. मंगला यूवराज नाटक, वय ५२ वर्ष, रा. पंचवटी काटोल काळे लेआउट हे भासरे मरण पावल्याने पुणे येथे घराला कुलूप लावून गेले असता कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे हॉलचे कुलुप तोडून आत प्रवेश करून सॅमसंग कंपनीचा मोबाईल किंमती अंदाजे १०,०००/– रू, टायटन कंपनीची घडयाळ किंमती अंदाजे ८०००/–रू., तिन जोड पायातील चाळ वजन ५० ग्रॅम किंमती अंदाजे २०००/– रू, पिगी बॅग आणि मडके त्यात साठवलेले अंदाजे १५०००/– रू. असा एकूण ३५०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे काटोल येथे आरोपीविरूद्ध कलम ४५४, ४५७, ३८० भांदवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ. १६४६ पोस्टे काटोल मो. नं. ९९२३३५२६४६ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत १० किमी अंतरावर बाबदेव शिवार येथे दिनांक २३/०५/२०२३ चे १६.३० वा. सुमारास आरोपी अशोक लेलॅन्ड कंपनीच्या टिप्पर क्र. एम. एच.– ४० सी.डी– ४५४५ च्या चालकाने आपले वाहन मौदा ते तारसा कडे भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन आपल्या समोरुन येणाऱ्या काळया निळया रंगाची एचएफडीलक्स हिरो कंपनीची मोटरसायकल एम. एच.–३५ ए.के. –८०६८ ला समोरुन धडक देवुन अपघात करुन मोटरसायकल चालक नामे –भावराव वसंत डोये, वय ३५ वर्ष, रा. पिपरी ता सडक अर्जुनी गोंदिया याला गंभीर जखमी करुन त्याच्या मृत्यु होण्यास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. चौधरी पोस्टे मौदा मो. क्र. ७०३८८२२२०५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**